आकाशवाणी पुणे
प्रादेशिक वृत्त विभाग
प्रादेशिक बातमीपत्र
सकाळी 07 वाजून 10 मि

दिनांक : 08.11.2026 **वार : रविवार**

---

1. दीपावलीच्या प्रकाशपर्वाचा देशभरात उत्साह; पंतप्रधानांची दिवाळी यंदाही जवानांसमवेत
2. राज्यातील दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्र्यांची दिवाळी शेतकऱ्यांच्या बांधावर
3. दुष्काळाच्या संकटात राज्य सरकार भक्कमपणे शेतकऱ्यांच्या पाठीशी उभं असल्याची मुख्यमंत्र्यांची ग्वाही
4. राज्य शिक्षण मंडळाच्या इयत्ता दहावी आणि बारावीच्या परीक्षांचं वेळापत्रक जाहीर आणि
5. न्यूझीलंडविरुद्ध दूसरा एकदिवसीय सामना जिंकत भारताची मालिकेत 2-0 अशी आघाडी

दिवाळी

दीपावलीच्या प्रकाश पर्वातील नरक चतुर्दशी आणि लक्ष्मीपूजनाचा सण आज देशभरात उत्साहाने साजरा होत आहे. घराघरात लखलखणारे विविधरंगी आकाश कंदील, पणत्या, दारातील रांगोळ्या, अभ्यंगस्नान, फराळाचे पदार्थ; असं उत्साहाचं वातावरण सर्वत्र दिसत आहे.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी देशवासियांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या आहेत. दिवाळीचा सण हा नकारात्मक प्रवृत्तींवर सद्गुणांच्या विजयाचं प्रतीक असल्याचं त्यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही दिवाळीनिमित्त समाज माध्यमावर चित्रफितीद्वारे शुभेच्छा दिल्या आहेत. नेहमीप्रमाणेचं यंदाही देशाच्या शूर जवानांच्या बरोबर हा सण साजरा करण्याची परंपरा पंतप्रधान कायम ठेवणार आहेत.

दिवाळी निमित्त अयोध्येत शरयू नदीच्या 56 घाटांवर काल 30 लाख दिवे प्रज्वलित करून दीपोत्सव साजरा करण्यात आला.

राज्यात यंदा दिवाळीच्या सणावर दुष्काळाचं सावट आहे; त्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यंदाची दिवाळी शेतकऱ्यांसमवेत साजरी करण्याचा निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री कालच नागपूर जिल्ह्यातील लोहारी सावंगा इथं दाखल झाले; गावातल्या ग्रामपंचायतीच्या आवारातील सभामंडपात गुरुदेव सेवा मंडळानं आयोजित केलेल्या प्रार्थना सभेत ते सहभागी झाले. नागपूरचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह अन्य मान्यवरदेखील यावेळी उपस्थित होते. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे विचार, त्यांची ग्रामगीता आणि भजनांचा संदर्भ देत मुख्यमंत्री म्हणाले की राष्ट्रसंतांनी मांडलेले विचार अत्यंत प्रेरक आणि दिशादर्शक आहेत. राज्यात दुष्काळाच्या स्वरूपात अस्मानी संकट उभं ठाकलं असताना राज्य सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभं आहे, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिली; ते म्हणाले.....

आज ज्यावेळी शेतकरी आमचा हवालदिल आहे, त्यावेळी सरकार म्हणून त्याच्या पाठीशी तर उभं राहिलंच पाहिजे.आणि म्हणून तो प्रयत्न तर आपण केलाच आहे. आपल्याला कल्पना आहे मागच्या काळामध्ये आपण कर्जमाफी जाहीर केली. आत्तापर्यंत 21 लाख खात्यांमध्ये पैसे जमा केले. अजूनही ती कर्जमाफी चालली आहे. जवळपास 55 लाख शेतकऱ्यांना कर्जमाफीचा फायदा आपण देणार आहोत. त्यासोबत आपण जवळपास, दीड कोटी शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये 5 हजार रुपयांची अग्रिम रक्कम त्या ठिकाणी जमा केली आहे, आणि आता लवकरच आपण जे दुष्काळाचे पैसे आहेत ते देखील जमा करणं सुरू करणार आहोत. त्यासोबत आपण आता विजेचं बिल तर शेतकऱ्यांचं माफ केलंच आहे, पण जुनं जेवढं पेंडिंग बिल आहे जवळपास 58 हजार कोटी रुपयांचं तेही पूर्ण माफ करण्याचा निर्णय आपल्या

शासनाने त्या ठिकाणी घेतलेला आहे. त्यामुळे सर्व पद्धतीने शेतकऱ्यांच्या पाठीशी उभं राहून त्यांना पुन्हा उभं करण्याचा प्रयत्न आपला आहे.

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर सर्व मंत्री शेतकाऱ्यांबरोबर दिवाळी साजरी करणार आहेत.

शेअर बाजार

परंपरेनुसार दिवाळीत लक्ष्मी पूजनानिमित्त देशांतर्गत शेअर बाजारात आज मुहुर्ताचे सौदे होणार आहेत. मुंबई शेअर बाजार आणि राष्ट्रीय शेअर बाजारात दुपारी दोन वाजून वीस मिनिटांपासून ते दुपारी साडेतीन वाजेपर्यंत हे मुहुर्ताचे सौदे होतील.

शेतकरी मदत

राज्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी आर्थिक दिलासा देण्यासाठी शासनानं जाहीर केलेल्या दिवाळी अग्रीम मदती अंतर्गत सांगली जिल्ह्यातील 2 लाख 6 हजार 600 शेतकऱ्यांच्या बँक खात्यांवर 103 कोटी 30 लाख रुपयांची रक्कम जमा करण्यात आली आहे. तर रत्नागिरी जिल्ह्यात 22 हजार 494 शेतकऱ्यांच्या बँक खात्यांमध्ये 11 कोटी 25 लाख रुपये जमा करण्यात आले आहेत, अशी माहिती जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. उदय सामंत यांनी दिली. दरम्यान पाच हजार रुपयांची मदत म्हणजे शेतकऱ्यांची क्रूर चेष्टा असून, शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख रुपये, तर शेतमजुरांना 25 हजार रुपये आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी आमदार रोहित पवार यांनी केली. लातूर जिल्ह्यात शिवणी इथं ते काल पत्रकारांशी बोलत होते.

फार्मर आयडी-नागपूर

1 जानेवारी 2015 पूर्वीपासून संबंधित जमीन कसत असल्याचा किमान एक पुरावा सादर करणाऱ्या शेतकऱ्यांना फार्मर आयडी अर्थात कृषि क्रमांक देण्यात येणार आहे, अशी माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. 1 जानेवारी 2015 पूर्वीपासून जमीन कसत असलेल्या, मात्र जमिनीच्या नोंदी उपलब्ध नसल्यामुळं फार्मर आयडी मिळू न शकलेल्या शेतकऱ्यांना या निर्णयामुळं आता फार्मर आयडी मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यामुळं अनेक वर्षांपासून जमिनीच्या नोंदीअभावी शासकीय योजनांच्या लाभापासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांना आता दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे.

डिजिटल क्रॉप सर्वे

केंद्र सरकारच्या डिजिटल क्रॉप सर्वे या मोबाईल ॲपवर पिकांची नोंदणी करण्यात तांत्रिक अडचणी येणाऱ्या राज्यातल्या जवळपास 70 लाख शेतकऱ्यांना आता ऑफलाइन पद्धतीनं ई-फेरफार प्रणालीद्वारे पिकांची नोंदणी करता येणार आहे. यासंबंधीचा शासन आदेश राज्याच्या महसूल विभागानं जारी केला आहे. सध्या सुरू असलेल्या खरीप हंगामात ज्या ठिकाणी पिकांची ऑनलाईन नोंदणी अद्याप झालेली नाही, तिथं तलाठी स्तरावरच्या अधिकाऱ्यांना पीक पाहणीची परवानगी या शासन आदेशानुसार देण्यात आली आहे.

पुणे वंदेमातरम

'वन्दे मातरम्' या राष्ट्रीय गीताला 151 वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त पुण्यातील ऐतिहासिक शनिवारवाड्यावर काल 38 हजार 233 पणत्या प्रज्वलित करण्यात आल्या. पुणे महापालिकेनं आयोजित केलेल्या या दीपप्रज्वलन सोहळ्याची गिनीज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद झाल्याची माहिती महापालिकेनं दिली आहे. गिनीजचे अधिकृत परीक्षक स्वप्नील डांगरीकर यांनी विक्रमाची घोषणा केली. महापौर मंजुषा नागपुरे आणि महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी प्रमाणपत्र स्वीकारलं. यावेळी देशासाठी बलिदान दिलेल्या जवानांच्या 50 वीरमाता आणि वीरपत्नींचा सन्मान करण्यात आला. लष्करी बँडचं वादन आणि विद्यार्थ्यांनी सादर केलेलं 'वन्दे मातरम्' गीत ही या सोहळ्याची वैशिष्ट्यं ठरली.

परीक्षा-वेळापत्रक

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळानं या शैक्षणिक वर्षासाठी इयत्ता दहावी आणि बारावीच्या परीक्षांचं अंतिम वेळापत्रक काल जाहीर केलं आहे. दहावीची लेखी परीक्षा 15 फेब्रुवारी ते 15 मार्च 2026 या कालावधीत होणार

असून प्रात्यक्षिक परीक्षा 28 जानेवारी ते 13 फेब्रुवारी 2027 दरम्यान होणार आहे. इयत्ता बारावीची लेखी परीक्षा 8 फेब्रुवारी ते 18 मार्च 2027 दरम्यान होणार असून प्रात्यक्षिक परीक्षा 20 जानेवारी ते 6 फेब्रुवारी या कालावधीत होणार आहे. परीक्षेचं सविस्तर वेळापत्रक मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलं आहे.

अन्न-औषध प्रशासन

दिवाळीच्या पार्श्वभूमीवर अन्न आणि औषध प्रशासनानं 6 आणि 7 नोव्हेंबरला राज्यभर विशेष तपासणी मोहीम राबवली. या मोहिमेत 73 आस्थापनांची तपासणी करून 43 परवाने निलंबित करण्यात आले.

निधन-मेहता

ज्येष्ठ प्रकाशक अनिल मेहता यांचं काल कोल्हापूर इथं निधन झालं. ते 86 वर्षांचे होते. पुस्तक विक्रेता म्हणून त्यांनी व्यवसायाला सुरुवात केली. मेहता यांच्या निधनानं साहित्य आणि प्रकाशन क्षेत्राची मोठी हानी झाली असल्याची भावना व्यक्त करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांना श्रद्धांजली अर्पण केली.

क्रिकेट

वेलिंग्टनमधील इथं खेळला गेलेला भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील दुसरा एकदिवसीय सामना रोमांचक आणि नाट्यमय ठरला. डकवर्थ-लुईस पद्धतीनुसार न्यूझीलंडला 4 धावांनी पराभूत करून भारताने पाच सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेत 2-0 अशी आघाडी घेतली आहे. मालिकेतील तिसरा एकदिवसीय सामना येत्या 10 नोव्हेंबर रोजी हॅमिल्टन इथं खेळला होणार आहे.

हवामान

राज्यात सर्वत्र आज हवामान कोरडं राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.